
(टिप :– सदर विषयाचा विचार माहे डिसेंबर २००८ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव

Unregistered

क्रं. ३१३,दि.२१/११/२००८ चा झाला आहे.)

**<u>विषय क्रं. ३८३</u>**

पुणे मनपा प्रशासनाकडे ''विशेष कार्याधिकारी (वृक्ष प्राधिकरण)'' या पदावर वनक्षेत्रपाल श्री. क्षिरसागर यु. जी. यांची महाराष्ट्र शासन आदेश महसूल व वन विभाग क्र. टी. आर. एफ. ०५/०८/प्रक्र. ३०५/फ–४ मंत्रालय, मुंबई – ३२,दि. ३० मे २००८ चे आदेशाने दि. ९/६/२००८ पासून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आल्याची नोंद घेण्याबाबत मा. महा. आयुक्त यांचे जावक क्र. मआ/उआ (जिंघ)/ से/३३३, दि. ३०/६/२००८ चे पत्र.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे डिसेंबर २००८ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. ३१२,दि.२१/११/२००८ चा झाला आहे.)

**<u>विषय क्रं. ३८४</u>**

पुणे महानगरपालिकेकडे विशेष कार्याधिकारी या पदावर मे.महाराष्ट्र शासनाकडील श्री.जीवन सोनवणे,यांची शासन आदेश क्रं.एम.सीओ १२०८/३६८/प्र.क्रं.७५/०८/नवि/१४ मंत्रालय,मुंबई, दि.१८ जुलै २००८ नुसार प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आल्याचे व ते दि.१९/७/२००८रोजी माध्योन्होत्तर रुजू करुन त्यांचेकडे उप आयुक्त (विभागिय कार्यालय क्रं.२) चे संपूर्ण कामकाज सोपविण्यात आल्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्रं.मआ/उआ (जिंघ)से,५०७,दिनांक ५/८/२००८.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे डिसेंबर २००८ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. ३०६,दि.२०/११/२००८ चा झाला आहे.)

**<u>विषय क्रं. ३८५</u>**

पुणे मनपा प्रशासनाकडे ''उपआयुक्त'' या पदावर महाराष्ट्र शासनाकडील निवडश्रेणी उपजिल्हाधिकारी श्री. सुधाकर तेलंग, यांची महाराष्ट्र शासन आदेश क्र. पी.एम.सी.– ३००८/प्र. क्र. ४४७/०८ नवि २२ मंत्रालय, मुंबई ३२,दि. २६/९/२००८ रोजी प्रतिनियुक्ती करण्यात आली असून ते दि. ४/१०/०८ रोजी कार्यालयीन वेळेपूर्वी कामावर रुजू झाले असून त्यांचेकडे आयातकर प्रमुख या पदाचा पदभार सोपविण्यात आलेबाबत मा. महा. आयुक्त यांचे जावक क्र. मआ/उआ(जिंघ)/से/७५८, दि. ३/११/२००८ चे पत्र माहितीसाठी.

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :– ८/१२/२००८.

**शरद समेळ,**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

UnRegistered

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :-१९/१२/२००८

**-: परिपत्र :-**

**पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्रं. १ (के) अन्वये बुधवार दि. १७/१२/२००८ रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता भरलेल्या माहे डिसेंबर २००८ या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यात आलेले विषय.**

**विषय क्रं. ३८६**

संदर्भ :- १) मा.सौ.रत्नप्रभा जगताप व मा.विशाल तांबे यांचे दि. २७/११/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १४७७, दि. १०/१२/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्रं.९७ आझादनगर स.नं.५७,५८ येथे ड्रेनेज लाईन व स.नं.७५ ताडीमळा येथील जुने शौचालय पाडून नविन शौचालय बांधणेसाठी र.रु.८.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-२००९ चे अंदाजपत्रक, ४ गवनि निधीतून करावयाची कामे पान नं. ३२, अ. क्र. ५ सुलभ पध्दतीची शौचालये बांधणे,जुनी मोडकळीस आलेली पाडून नव्याने बांधावयाची शौचालये, यादी क्रं.जी-६ बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय, पान नं.३०३,अ.क्रं.२० वॉर्ड क्रं.९७ आझादनगर येथे स:शुल्क शौचालय बांधणे. | ८.५० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| १)वॉर्ड क्रं.९७ आझादनगर स.नं.५७,५८ येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | ५ लाख |
| २)स.नं.७५ ताडीमळा येथील जुने शौचालय पाडून नविन शौचालय बांधणे. | --- | ३.५० लाख |

**विषय क्रं. ३८७**

संदर्भ :- १) मा.शंकर उर्फ बंडु केमसे व मा.भिमराव खरात यांचे दि. २७/११/२००८ चे पत्र.
२) मा.सुनिल बनकर व मा.शंकरराव बेलदरेपाटील यांची उपसूचना.
३) स्थायी समिती ठराव क्र. १५५६, दि. १०/१२/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

कोथरुड येथे भुसारी कॉलनीमध्ये सावली ही संस्था गेले १५ वर्षाहून अधिक काळ मतिमंद व बहुविकलांग मुलांचे पुर्नवसन करत आहे. आईवडिलांच्या पश्चात व हयातीत तीव्र अपंगत्व असलेल्या मतिमंदांना कायमस्वरुपी निवास देऊन अनेक पालकांना मदत करत आहे. संस्थेच्या उत्कृष्ठ कार्याबद्दल संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचा महानगरपालिकेने गौरव केलेला आहे. अनेक अडचणींना तोंड देऊन काम करत असलेल्या व इतर अनेक गरीब मतिमंद मुलांना शिक्षण देणाऱ्या या संस्थेस र.रुपये ५,००,०००/- (रुपये पाच लाख) इतकी देणगी देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

तसेच सन २००९-१० च्या अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी.

**विषय क्रं. ३८८**

संदर्भ :- १) मा.शैलेश चरवड व मा.बाळासाहेब कापरे यांचे दि. १/१२/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १५६०, दि. १०/१२/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्रं.१३१ माणिकबाग स.नं. ३७/४०/४९ येथे कॅनॉलला लागून सिमाभिंत बांधणेसाठी र.रु.५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

Unregistered

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, क्षेत्रिय कार्यालयाने नागरिकांच्या सहभाग योजनेअंतर्गत करावयाची कामे, टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय, पान क्र. सीटीझेडएन४०, यादी क्र. कोड नं. झेडई १६ अे११७/सी६-८७, वॉर्ड क्र. १३१ जाधवनगर स.नं. ४१ येथे पाण्याची लाईन टाकणे (२ प्रस्ताव) | ५ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्रं.१३१ माणिकबाग स.नं. ३७/४०/४९ येथे कॅनॉलला लागून सिमाभिंत बांधणे | --- | ५ लाख |

**विषय क्रं. ३८९**

संदर्भ :- १) मा.शैलेश चरवड व मा.बाळासाहेब कापरे यांचे दि. १/१२/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १५६१, दि. १०/१२/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉ.क्रं.१३१ माणिकबाग स.नं. ३७/४०/४९ येथे कॅनॉलला लागून सिमाभिंत बांधणेसाठी र.रु.४ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, १८.सांस्कृतिक केंद्र, पान क्र. २०२, अ.क्र.२३, शहरातील विविध ठिकाणी सांस्कृतिक हॉल बांधणे, (यादी एस-२२), पान क्र. २९३, अ.क्र. ६, वॉर्ड क्र. १३१ स.नं. ४० इंडियन ह्यूम पाईप कंपनीसमोर सांस्कृतिक भवन (कल्चरल सेंटर) उभारणे | ४ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्रं.१३१ माणिकबाग स.नं. ३७/४०/४९ येथे कॅनॉलला लागून सिमाभिंत बांधणे | --- | ४ लाख |

**विषय क्रं. ३९०**

संदर्भ :- १) मा.शैलेश चरवड व मा.बाळासाहेब कापरे यांचे दि. १/१२/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १५६२, दि. १०/१२/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉ.क्रं.१३१ माणिकबाग स.नं. ३७/४०/४९ येथे कॅनॉलला लागून सिमाभिंत बांधणेसाठी र.रु.४ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, २.प्राथमिक शिक्षण, पान क्र. १३४, अ.क्र. १३३, शहरातील विविध ठिकाणी प्राथमिक शाळांमध्ये विकासाची कामे करणे, पान क्र. २८७, अ.क्र. ३६, यादी क्र. एस-२३, वॉर्ड क्र. १३१ स.नं. ३५ माणिकबाग इंडियन ह्यूम पाईप कंपनीसमोर प्रायमरी स्कूल बांधणे | ४ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्रं.१३१ माणिकबाग स.नं. ३७/४०/४९ येथे कॅनॉलला लागून सिमाभिंत बांधणे | --- | ४ लाख |

**विषय क्रं. ३९१**

संदर्भ :- १) मा.शैलेश चरवड व मा.बाळासाहेब कापरे यांचे दि. १/१२/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १५६३, दि. १०/१२/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन ड्ड

वॉ.क्रं.१३१ मधील स.नं. ४३/१अ समाजमंदिरशेजारी (तुकाईनगर) भाजी मंडई उभारणेसाठी र.रु.४ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

UnRegistered

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, १९.भाजी मंड्या व पशुवधगृहे, पान क्र. २०६, अ.क्र. १७, शहरातील विविध भाजी मंड्यांमध्ये विकास कामे करणे, (यादी क्र. एस २९), पान क्र. २९६, अ.क्र. १४, वॉर्ड क्र. १३१ स.नं. ३४ माणिकबाग येथील जागेत भाजी (ओटा मार्केट) विकसित करणे | ४ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉ.क्रं.१३१ मधील स.नं. ४३/१अ समाजमंदिरशेजारी (तुकाईनगर) भाजी मंडई उभारणे | --- | ४ लाख |

**विषय क्रं. ३९२**

संदर्भ :- १) मा.महापौर यांचे दि. २४/११/२००८ चे पत्र.
२) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/उरा(ज)/९३५ दि. १/१२/२००८ चे पत्र.
३) स्थायी समिती ठराव क्र. १६१४, दि. १०/१२/२००८.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे ड्ढ

पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशन यांनी पुणे महापौर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा २००८ (पुरुष/महिला) दि. १२ ते १६ डिसेंबर २००८ या कालावधीत घेणेबाबत मा.महापौर यांना कळविले आहे. सदर पत्रावर मा.महापौर यांनी पुणे महापौर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी र.रुपये २० लाख आदा करण्यात यावेत अशी शिफारस केली आहे.

तरी पुणे महापौर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा २००८ करिता मा.महापौर यांनी शिफारस केल्याप्रमाणे प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चानुसार पं.नेहरु स्टेडियम विभागाकडील खालील अर्थशिर्षकामधून पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनला र.रुपये २०,००,०००/- (र.रुपये वीस लाख फक्त) आदा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अंदाजपत्रक वर्ष सन २००८-०९, (आरई२७अे११९), १७.खेळ व क्रिडांगणे, क-पं.नेहरु स्टेडियम, १९.महापौर चषक कबड्डी स्पर्धा र.रुपये २० लाख.

**विषय क्रं. ३९३**

संदर्भ :- १) मा.दिलिप उंबरकर व मा.सौ.ज्योत्स्ना सरदेशपांडे यांचे दि. १०/१२/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६२२, दि. १०/१२/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन ड्ढ

वॉर्ड क्रं.५९ मध्ये विविध ठिकाणी पाण्याची लाईन टाकणेसाठी र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, १९.भाजी मंड्या व पशुवधगृहे, पान क्र. २०६, अ.क्र. १७, शहरातील विविध भाजी मंड्यांमध्ये विकासकामे करणे (यादी एस-२९), पान क्र. २९६, अ.क्र. ५, प्रभाग क्र. ५९ मध्ये भाजी मार्केट बांधणे | १० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्रं.५९ मध्ये विविध ठिकाणी पाण्याची लाईन टाकणे | --- | १० लाख |

**विषय क्रं. ३९४**

संदर्भ :- १) मा.शिवराम मेंगडे यांचे दि. २१/११/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १४६८ दि. २५/११/२००८.
३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्र.मआ/भरका/९७४ दि.५/१२/२००८ ने पाठविलेला अभिप्राय.
४) स्थायी समिती ठराव क्र. १६२४, दि. १०/१२/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

Unregistered

वॉ.क्रं.११२, स.नं. ११/२ कर्वेनगर येथे जलतरण तलाव बांधणेकरीता र.रु. ४१.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, १७.खेळ व क्रिडांगणे, (यादी क्र. एस-२८), पान क्र. २९५, अ.क्र. २३, स.नं. ९ येथे जलतरण तलाव बॅडमिंटन हॉल बांधणे | ४१.५० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉ.क्रं.११२,महर्षि कर्वेनगर स.नं. ११/२ कर्वेनगर येथे जलतरण तलाव बांधणे | --- | ४१.५० लाख |

**विषय क्रं. ३९५**

संदर्भ :- १) मा.विनोद ओरसे यांचे दि. ६/१२/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६३०, दि. १०/१२/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्रं.५५ मध्ये गोखलेनगर येथे विविध ठिकाणी कॉंक्रीट करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणेसाठी र.रु.३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-२००९ चे अंदाजपत्रक, १८.सांस्कृतिक केंद्रे, पान क्र. २०२, अ.क्र. २३, शहरात विविध ठिकाणी सांस्कृतिक हॉल व स्मारक बांधणे, (यादी क्र. एस-२२), पान क्र. २९३, अ.क्र. ३, वॉर्ड क्र. ५५ गोखलेनगर येथे रामोशीवाडी मोठी सांस्कृतिक हॉल बांधणे. | ३० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्रं.५५ मध्ये गोखलेनगर येथे विविध ठिकाणी कॉंक्रीट करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे | --- | ३० लाख |

**विषय क्रं. ३९६**

संदर्भ :- १) मा.विनोद ओरसे यांचे दि. ६/१२/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६३१, दि. १०/१२/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्रं.५५ मध्ये गोखलेनगर येथे विविध ठिकाणी कॉंक्रीट करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणेसाठी र.रु. ८ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-२००९ चे अंदाजपत्रक, ४.गवनि निधीतून करावयाची कामे, ४अ. मागासवर्गीय कल्याणकारी योजना, पान क्र. २३४, अ.क्र. १२, शहरात विविध ठिकाणी समाजमंदिर बांधणे.(यादी एस-३७), पान क्रं.३०७, अ.क्रं.१३, वॉर्ड क्र. ५५ गोखलेनगर येथे गोपाळ कृष्ण मित्र मंडळ याठिकाणी समाज मंदिर बांधणे. | ८ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्रं.५५ मध्ये गोखलेनगर येथे विविध ठिकाणी कॉंक्रीट करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे | --- | ८ लाख |

**विषय क्रं. ३९७**

संदर्भ :- १) मा.बाबुराव चांदेरे व मा.प्रमोद निम्हण यांचे दि. ८/१२/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६३२, दि. १०/१२/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

बाणेर बालेवाडी विविध ठिकाणी इंटरलॉकींग ब्लॉक्स बसविणेकरीता र.रु. १० लाखाचे

Unregistered

खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–२००९ चे अंदाजपत्रक, ४.गवनि निधीतून करावयाची कामे, पान क्र. २३२, अ.क्र. ५, सुलभ पध्दतीची शौचालये बांधणे, (यादी एस–१९), पान क्रं.३०४, अ.क्रं. ८, वॉर्ड क्र. २८ बाणेर गावठाण येथे २० शिटसचे शौचालय बांधणे. | १० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| बाणेर बालेवाडी विविध ठिकाणी इंटरलॉकींग ब्लॉक्स बसविणे. | --- | १० लाख |

**विषय क्रं. ३९८**

संदर्भ :– १) मा.दत्तात्रय ससाणे व मा.संजय नांदे यांचे दि. ६/१२/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६३३, दि. १०/१२/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

हडपसर, ससाणेनगर येथील स.नं. ३११ गल्ली क्र. ४ मधील रस्ता कॉंक्रीटीकरण करणेकामी र.रु. ८.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–२००९ चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १७२, अ.क्र. ६३, शहरात विविध ठिकाणी रस्तारुंदीकरणामुळे काढावयाचे धोकादायक पोल्स (यादी क्र. बी–६), पान क्रं. २८२, अ.क्रं. ८१, वॉर्ड क्र. ९१ हडपसर सोलापूर रोड ते कॅनॉल गंगा रेसिडेन्सी येथील परिसरातील धोकादायक विद्युत पोल्स शिफ्ट करुन भुमिगत केबल टाकणे | ८.५० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| हडपसर, ससाणेनगर येथील स.नं. ३११ गल्ली क्र. ४ मधील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे | --- | ८.५० लाख |

**विषय क्रं. ३९९**

संदर्भ :– १) मा.दत्तात्रय ससाणे व मा.शैलेंद्र नलावडे यांचे दि. ६/१२/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६३४, दि. १०/१२/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

हडपसर, ससाणेनगर येथील स.नं. ३११ मधील रस्ता कॉंक्रीटीकरण करणेकामी र.रु. ८.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–२००९ चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १७२, अ.क्र.६३, शहरात विविध ठिकाणी रस्तारुंदीकरणामुळे काढावयाचे धोकादायक पोल्स (यादी क्र. बी–६), पान क्रं.२८२, अ.क्रं.८२, वॉर्ड क्र.९१ हडपसर गाव येथील परिसरातील धोकादायक पोल शिफ्ट करुन भुमिगत केबल टाकणे | ८.५० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| हडपसर, ससाणेनगर येथील स.नं. ३११ मधील रस्ता कॉंक्रीट करणे | --- | ८.५० लाख |

**विषय क्रं. ४००**

संदर्भ :– १) मा.दत्ता खाडे व मा.अशोक येनपुरे यांचे दि. ८/१२/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६३५, दि. १०/१२/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं.३५ ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र उभारणे तसेच महिला ग्रामउद्योग केंद्र उभारणेसाठी र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे

Unregistered

शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-२००९ चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणी संग्रहालये, पान क्र. १९६, अ.क्र. ९१, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी क्रं.एस-२७), पान क्रं. २९४, अ.क्रं. ९, वॉर्ड क्र. ३५ पर्यटकांसाठी आकर्षण तसेच शहरातील नागरिकांना,विद्यार्थ्यांना पवनचक्कीची माहिती व्हावी यासाठी पवनचक्की उभारणे | १० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| १) वॉर्ड क्रं.३५ ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र उभारणे. | --- | ४ लाख |
| २) महिला ग्रामउद्योग केंद्र उभारणे. | --- | ६ लाख |

**विषय क्रं. ४०१**

संदर्भ :- १) मा.विष्णू हरिहर व मा.अजित आपटे यांचे दि. १६/१२/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६९२, दि. १६/१२/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉ.क्र.८५ मध्ये विविध ठिकाणी गल्लीबोळ सिमेंट कॉक्रीट करणे व फुटपाथवर ब्लॉक बसविणे तसेच इतर तदनुषंगिक कामे करण्यासाठी र.रु.२५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-२००९ चे अंदाजपत्रक, ४.गवनि निधीतून करावयाची कामे, ४ब-महिला बाल कल्याण योजना निधी, पान क्र. २३४, अ.क्र. १९, महिला बाल कल्याण निधी अंतर्गत करावयाची कामे, (यादी क्रं.एस-२८), पान क्र.३०८,अ.क्रं.२१, वॉर्ड क्र. ८५ गंज पेठ म.फुले येथे बालवाडी बांधणे सावित्रीबाई फुले महिला आघाडी व्यायामशाळा कॅम्पुटर वर्ग सुरु करणे. | २५ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉ.क्र.८५ मध्ये विविध ठिकाणी गल्लीबोळ सिमेंट कॉकीट करणे व फुटपाथवर ब्लॉक बसविणे.तसेच इतर तदनुषंगिक कामे करणे | --- | २५ लाख |

**विषय क्रं. ४०२**

संदर्भ :- १) मा.विरेंद्र किराड व मा.अविनाश साळवे यांचे दि. १६/१२/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६९४, दि. १६/१२/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

जगदगुरु श्री संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या जन्म चतु:शताब्दीनिमित्त पुणे शहराच्या वतीने दि. २/१/२००९ ते ८/१/२००९ या कालावधीत तुकाराम महाराज गाथा पारायण व ह.भ.प.बाबा महाराज सातारकर यांचे किर्तन महोत्सव आयोजित केले आहे. सदर सोहळा शनिवारवाड्यासमोरील पटांगणात, भारतीय वारकरी मंडळ, ५२ रविवार पेठ, पुणे यांनी आयोजित केला आहे. या कार्यक्रमासाठी पुणे मनपाने सहप्रायोजकत्व स्विकारुन र.रुपये ७ लाख अर्थसहाय्य द्यावे. यासाठी अंदाजपत्रकातील १४.वसुधैव कुटूंबकम या अर्थशिर्षकातून वर्गीकरणाने रक्कम उपलब्ध करुन देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर सदर ठरावाची कार्यवाही करण्यात यावी.

**विषय क्रं. ४०३**

संदर्भ :- १) मा.सुनिल गोगले व मा.हनिफ शेख यांचे दि. १५/१२/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६९५, दि. १६/१२/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्रं.१६ फुलेनगर येथे आंबेडकर सोसायटी मध्ये प्रकाश व्यवस्था करणे तसेच

UnRegistered

करुणा,पर्णकुटी,अहिल्या सोसायटी मध्ये प्रकाश व्यवस्था करण्यासाठी र.रु.१७ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–२००९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १४८, अ.क्र.२, शहरातील रस्ते नियोजनाने डांबरीकरण करणे. (यादी क्रं.ए–२), पान क्रं.२४५,अ.क्रं.४०, वॉर्ड क्र. १६ आंबेडकर सोसायटी मधील रस्ते करणे. | १७ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| १) आंबेडकर सोसायटी मध्ये प्रकाश व्यवस्था करणे. | --- | १० लाख |
| २) करुणा,पर्णकुटी,अहिल्या सोसायटी मध्ये प्रकाश व्यवस्था करणे. | --- | ७ लाख |

**विषय क्रं. ४०४**

संदर्भ :– १) मा.वसंत मोरे व मा.संदिप लडकत यांचे दि. १६/१२/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. १६९६, दि. १६/१२/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. १४१ याठिकाणी गुजरवाडी, मस्तान हॉटेलमागे, जाधवनगर येथे रस्ता ग्राऊट करणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–२००९ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १८०, अ.क्र. ३५, शहरात विविध ठिकाणी व्यायामशाळा बांधणे, (यादी क्र. एस–१२), पान क्र. २९१, अ.क्र. २०, वॉर्ड क्र. १४१ कात्रजगाव येथे व्यायामशाळेवर मजला वाढविणे | १० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. १४१ याठिकाणी गुजरवाडी, मस्तान हॉटेलमागे, जाधवनगर येथे रस्ता ग्राऊट करणे | --- | १० लाख |

**विषय क्रं. ४०५**

संदर्भ :– १) सोनिया ग्रामउद्योग प्रशिक्षण केंद्र संस्था यांचा अर्ज.

२) मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/भूजिं/१०१८ दि. १२/१२/२००८ चे पत्र.

३) स्थायी समिती ठराव क्र. १७००, दि. १६/१२/२००८.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

सोनिया ग्रामउद्योग प्रशिक्षक संस्थेस येरवडा फा.प्लॉट नं. ७०/९ औंध स.नं.४६ येथील क्षेत्रिय कार्यालय लगतची व कात्रज स.नं.१३० ते १३३ येथून कचऱ्यातील प्लॅस्टिक वेगळे करण्यासाठी खालील अटीस अधिन राहून पुणे मनपा व सोनिया ग्रामउद्योग केंद्र संस्था यांचे दरम्यान सदर ठिकाणी ओला व सुका कच–यातील प्लॅटिक वेगळे, करण्याचा संयुक्त प्रकल्पाचा ३० वर्षे मुदतीसाठी करारनामा करणेस खालील बाबींचे अधीन राहून मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(अ)** या संयुक्त प्रकल्पासाठी वरील ३ ठिकाणाच्या जागेमध्ये कचरा हस्तांतरण केंद्रावर कोरडा कचरा व प्लॅटिक विलगीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात येईल या कामासाठी योग्य त्या आकाराची रोड बांधण्यास संस्थेस परवानगी दिली जाईल. मात्र सोनिया ग्रामउद्योग केंद्र संस्थेस देण्यात येणा–या जागेची मालकी पुणे म.न.पा.ची राहिल व सदर जागा संस्थेस हस्तांतरण होणार नाही.

**(ब)** विलीनीकरणाव्द्रारे उपलब्ध कोरडा कचरा व प्लॅस्टिक यांची योग्य ती विल्हेवाट लावण्याची परवानगी देण्यात येईल या प्रकल्पाची उपयुक्तता लक्षात घेऊन संयुक्त प्रकल्प ३० वर्षे मुदतीसाठी राबविणेत येईल. मात्र संस्थेने दर ५ वर्षांनी ताळेबंद मा. मुख्य लेखा परिक्षक यांचेकडून तपासून कोरडा कचरा व प्लॉटिक यांच्या विल्हेवाटव्द्रारे प्रक्रियेव्द्रारे विक्रीव्द्रारे व अन्य प्रकारे होणा–या नफ्यापैकी प्रतीवर्षी होणाऱ्या नफ्यापैकी २० टक्के पुणे म.न.पा.कडे जमा करावी लागेल.

UnRegistered

**<u>अटी :–</u>**

१) मा. मुख्य सभेचे मान्यता दिलेनंतर संस्थेने सदर संयुक्त प्रकल्पाचा करारनामा दोन महिन्याचे आत करून घेतला पाहिजे अन्यथा प्रकल्प रदद् समजण्यात येईल.

२) सदर संयुक्त प्रकल्पासंदर्भात वरील उददेशाशिवाय अन्य कोणत्याही कारणासाठी वापर अनुज्ञेय राहणार नाही अशा प्रकारे अन्य वापर होत असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा सदर प्रकल्पाची अंमलबजावणी योग्य रितीने होत नसल्याचे निदर्शनास आल्यास अथवा सदर संयुक्त प्रकल्पाद्वारे पुणे महानगरपालिकेस ओला व सुका कचरा विलिणीकरणाद्वारे दृष्टीने फायदा होत नसल्याचे निदर्शनास आल्यास सदर प्रकल्प तात्काळ रदद् करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना राहील व त्यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

३) भविष्यात कचरा हस्तांतरण केंद्राच्या वाढीसाठी वा अन्य कारणासाठी सदर जागेची आवश्यकता भासल्यास त्या त्या जागेच्या प्रकल्प रदद् करून इतरत्र हलविणे आवश्यक राहिल. यासाठी संस्थेची कोणतीही तक्रार राहणार नाही.

४) सदर कचरा हस्तांतरण केंद्रावर या प्रकल्पासाठी सुयोग्य जागा निश्चित करणे शेडची आवश्यकतेनुसार आकार ठरविणे हे अधिकार उप आयुक्त (घनकचरा व व्यवस्थापन ) यांना राहील.

५) सदर संयुक्त प्रकल्पाच्या जमाखर्च ताळेबंदाची तपासणी पुणे महानगरपालिकेच्या लेखा परिक्षण कार्यालयाकडून करून घेणे आवश्यक राहील व त्या दृष्टीने संस्थेस जमाखर्च व अनुषंगिक दस्तऐवज ठेवावे लागतील.

६) कोरडा कचरा अगर मिश्रीत कचरा यातून प्लॉटिक व इतर कोरडा कचरा वेगळा करणे याबाबत संपूर्ण जबाबदारी (उदा. कर्मचारी नेमणूक ) ही सोनिया ग्रामद्योग प्रशिक्षण केंद्र यांची राहील.

७) प्लॅाटिक व कोरडा कचरा या पासून मिळणा–या दैनंदिन उत्पन्नाची माहिती संकलित करून ती म.न.पा. आरोग्य खाते (घनकचरा व्यवस्थापन ) विभागाकडे दर महिन्याला सोनिया ग्रामद्योग प्रशिक्षण केंद्र यांनी पुरवली पाहिजे.

८) सदर ठिकाणी कामे करताना येथील कर्मचा–यांचा अपघात किंवा इजा झाल्यास त्यास पुणे म.न.पा. जबाबदार राहणार नाही. त्याची संपूर्ण जबाबदारी सोनिया ग्रामद्योग प्रशिक्षण केंद्र संस्थेवर राहिल.

९) कचरा हस्तांतरण केंद्रावर या कामाची देखरेख संबंधित क्षेत्रिय अधिकारी ठेवतील.

१०) या अटी व्यतिरिक्त अन्य अटी ठरविण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

**<u>विषय क्रं. ४०६</u>**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे क्रं. मआ/उआ(गवनि)/९५२ दि. ३/१२/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. १६१५, दि. १०/१२/२००८.

–––

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

कोंडवाडा विभागासाठी पुरविलेल्या चारा खर्चाचे बिल आदा करण्यासाठी व नोव्हेंबर २००८ ते मार्च २००९ या कालावधीमध्ये कुट्टी खरेदीसाठी अंदाजपत्रकातील मान्य तरतुदीमधून र.रुपये १.७० लाखाचे वर्गीकरण उपआयुक्त(गवनि) कोंडवाडा विभाग, ग.कोंडवाडे पोलिस खर्च, आरई२५सी–१०३ या खात्यातून उपआयुक्त(गवनि) कोंडवाडा विभाग, ग.कोंडवाडे चारा खर्च, आरई२५सी–१०४ या खात्याकडे वर्ग करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्रं. ४०७</u>**

संदर्भ :– १) मा.स्थायी समिती ठराव क्र. १९२९ दि. २८/२/२००८.

२) मा.मुख्य सभा ठराव क्र. ९० दि. ९/६/२००८.

३) एम.सी.सी.आय.ए.यांचे दि. १७/११/२००८ रोजीचे पत्र.

४) मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/उआ(भुजिं)/९६८ दि. ५/१२/२००८ चे पत्र.

५) स्थायी समिती ठराव क्र. १६२३, दि. १०/१२/२००८.

–––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

येरवडा रामवाडी जकातनाका स्थलांतर करणेसंबंधी विशेषत: आयातकर प्रमुख यांचा नाका स्थलांतरीत केल्यास उत्पन्न वाढ होणार असल्याचा अभिप्राय तसेच सदर अस्तित्वातील नाक्यामुळे रस्त्यावर होणारी वाहतुकीची कोंडी दुर करणे संदर्भात एमसीसीआयए व अन्य नागरिकांनी वेळोवेळी केलेली मागणी व

UnRegistered

मा.नगर अभियंता यांचा मा.महा.आयुक्त यांच्या पत्रात नमूद केलेला अभिप्राय विचारात घेऊन सदर नाका खराडी स.नं. ५६/२ब व ५६/२ब/२ मिळकतीपैकी ५ एकर जागेवर स्थलांतरीत करण्यासाठी मे.ब्रम्हा बिल्डर्स या संबंधित मिळकतधारकाचे हक्क तपासून त्यांचेशी ५ वर्षे अथवा अन्य जागांचे भूसंपादन पूर्ण होईल (यापैकी जे आधी होईल ते) या कालावधीसाठी प्रति महा प्रति एकर रुपये दोन लाख या दराने ५ एकर जागा भाडेतत्वावर देण्यास व त्यासाठी करारनामा करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं. ४०८**

संदर्भ :- १) नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन पत्र जा.क्र.टीपीएस १८०३/११२४/सीआर ४०/२००३/युडी १३, दि. १४/८/०३.
२) खात्याने यापूर्वी सादर केलेले विषयपत्र जा.क्र.मआ/विअ (वियो) ६०१ दि. १२/९/०३
३) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. ३४०, दि. २६/९/०३
४) मा.मुख्य सभा ठराव क्र. ३८५, दि. ९/१०/०३
५) नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना पाठविलेले पत्र जा.क्र. डीपीजी/१२८, दि. १९/११/०३
६) नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र. टीपीएस १८०८/१७८३/प्र. क्र. १३६३/०८/नवि १३ दि. २८/८/०८.
७) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/वियो/८१०, दि. १५/११/२००८ चे पत्र.
८) मा. अंकुश तिडके व मा.विशाल तांबे यांची दि. ८/१२/०८ ची उपसूचना.
९) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. १८३, दि. ८/१२/२००८

---

मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्र अवलोकन केले. तसेच शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

स.नं.१३०, १३१ कात्रज व स.नं.२६, २७ धनकवडी येथील भारती विद्यापीठाचे आवारातून जाणारा २० मी. रूंदीचा विकास योजना रस्ता हा त्या भागातील नागरिकांची गरज आहे. म्हणून मा.मुख्य सभा ठराव क्र. ३८५, दि. ९/१०/०३ च्या ठरावात नमूद केल्यानुसार सदरचा रस्ता रद्द न करता कायम ठेवण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं. ४०९**

संदर्भ :- १) मा.संजय नांदे यांचे दि.५/६/०७ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.५८, दि. ८/६/२००८
३) मा. सतीष फरांदे व मा.संजय नांदे यांचे दि.३/१२/०७ चे पत्र.
४) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.३५९, दि. १/१/२००८
५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/४८८,दि.१/८/०८ ने पाठविलेला अभिप्राय
६) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. १८६, दि. ८/१२/२००८.

विषय :- आंबेगांव ( बु ) मधील स.नं.३१/१ व ३१/२ येथील नागरिकांच्या हितासाठी दक्षिण उत्तर असा कलम २०५ अन्वये ६.०० मीटर रस्ता आखणेबाबत.

---

मा. महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

संदर्भांकिंत ठरावाच्या अनुषंगाने जागेवर प्रत्यक्ष पाहणी केली असता, विषयांकित रस्ता हा स.नं.३१ ऐवजी आंबेगांव ( बु ) स.नं.३२ मधून जात असल्याने मा.महा.आयुक्त यांचे पत्रासोबतच्या नकाशात दर्शविल्या प्रमाणे अस्तित्वातील रस्त्यास जोडला जात आहे. या अनुषंगाने स.नं.३१/४, धनकवडी, आंबेगाव येथे राहणा–या नागरिकांनी दि. ३/१२/२००७ रोजी पुणे महानगरपालिकेकडे विषयांकित रस्ता करून मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे त्यामुळे संदर्भांकिंत ठरावान्वये बी.पी.एम.सी.ॲक्ट १९४९चे कलम २०५ अन्वये सुचविण्यात आलेला रस्ता आखणेस मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं. ४१०**

संदर्भ :- १) मा.अविनाश साळवे व मा.विरेंद्र किराड यांचे दि. २०/१०/२००८ चे पत्र.
२) मा. शहर सुधारणा समिती ठ.क्र.१६८, दि. १५/११/२००८
३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/७५३, दि. ३१/१०/२००८ चे पत्र.

Unregistered

४) मा. शहर सुधारणा समिती ठ.क्र.१७५, दि. १५/११/२००८.
५) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. १८९, दि. ८/१२/२००८.

---

संदर्भ क्र. २ व ४ अन्वये सदर विषयाची जागा पहाणी करण्यात आली.

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

बंडगार्डन रस्ता ते डेक्कन कॉलेज रस्ता यांना जोडणारा मुळा – मुठा नदीवर पूलासह २१ मी.रूंदीचा ॲप्रोच रस्ता कलम २०५ अन्वये आखणेबाबत मा.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबत जोडलेल्या नकाशात **अे** व **बी** नुसार दर्शविल्याप्रमाणे २१ मी.रूंदीचा रस्ता मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये आखणेस मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

UnRegistered

(11)

संदर्भ क्र. २ व ४ अन्वये सदर विषयाची जागा पहाणी करण्यात आली.

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

बंडगार्डन रस्ता ते डेक्कन कॉलेज रस्ता यांना जोडणारा मुळा – मुठा नदीवर पूलासह २१ मी.रूंदीचा ॲप्रोच रस्ता कलम २०५ अन्वये आखणेबाबत मा.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबत जोडलेल्या नकाशात **अे** व **बी** नुसार दर्शविल्याप्रमाणे २१ मी.रूंदीचा रस्ता मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये आखणेस मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**